**फारूक सत्तार उमर भॉय हायस्कूल फॉर बॉइज़**

**सहामाही परीक्षा ऑक्टोबर २०२३**

| | | |
|---|---|---|
| **विषय: मराठी** | **इयत्ता: नववी** | **गुण: 40** |
| **दिनांक:27/10/23** | | **वेळ:2 तास** |

प्र. 1 . {अ} उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

1. आकृतिबंध पूर्ण करा. [2]

दादूचे सोलापुरात न राहण्याचे कारण
- ↓ ______
- ↓ ______

2. चौकटी पूर्ण करा. [2]

i) दादूच्या मुलाचे नोकरीचे ठिकाण → ______

ii) दादुच्या जमिनीचा तुकडा सावकाराकडे → ______

> त्याचा मुलगा माझ्याएवढाच होता. सोलापूरला कुठल्याशा गिरणीत होता तो. दादूच्या खेड्यातला जमिनीचा एक तुकडा सावकाराकडे खूप दिवस गहाण पडला होता. म्हातारपणामुळे शेती होईनाशी झाली, तेव्हा बायकोला घेऊन तो इथे आला आणि त्याने मुलाला सोलापूरला पाठवले. फार उशिरा झालेला एकुलता एक मुलगा होता तो त्याचा. ''तुम्ही आई-बाप सोलापूरला मुलाकडेच का राहत नाही?'' म्हणून मी त्याला विचारले. तेव्हा त्याने सांगितले, ''आम्ही दोघं सोलापूरला गेलो, की तिथं पोराचा खर्च वाढणार, मग तो सावकाराकडली जमीन सोडवून कशी घेणार? बायको इथं कडधान्ये विकून चार पैसे मिळवते. सोलापुरात ती काय करणार? तिथं मोड खपतात की नाही कोण जाणे नि सोलापुरात इथल्यासारखी कॉलेजं नाहीत, तेव्हा माझ्यासारख्या म्हाताऱ्याला तिथं कोण काम देणार?

3. दादू पाठातील तुम्हाला सर्वांत आवडलेली बाब तुमच्या शब्दांत लिहा. [2]

प्र. 1 {आ} उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

1. आकृती पूर्ण करा. [2]

i) या लेण्यात चित्रांची भारीमार
- ↓ ______
- ↓ ______

ii) गांधकुतीतील चित्रांची कोणतेही दोन वैशिष्ट्ये [2]
- ↓ ______
- ↓ ______

या गंधकुटी लेण्यात अन् सोळा व सतरा या क्रमांकांच्या लेण्यांत चित्रांची भरभार आहे. जिकडे पाहाल तिकडे चित्रंच चित्रं. साधी एकरंगी नव्हेत, तर बहुरंगी! रंग तरी कसे, तर सौम्य अन्टिकाऊ! यांतली बहुतेक चित्रं बुद्ध आणि त्याचा धर्मया विषयांचीच आहेत कारण बौद्ध धर्माच्या लोकांनीच हीलेणी खोदली आहेत. गौतम बुद्धांच्या काही मजेदार कथा आहेत. त्यांना जातककथा असं म्हणतात. बुद्धांनी पूर्वी कोणत्या जातींत अन् प्राण्यांच्या रूपात जन्म घेतले, त्यांच्या त्या कथा आहेत. त्यांपैकी कित्येक कथा या लेण्यांत चित्रित केल्या आहेत.सोळाव्या लेण्यातली सगळी चित्रं बुद्धांच्या शेवटच्या जन्मातली आहेत. मुलांनो; तुम्ही ती ओळीनं पाहात चला. हे मायावतीला म्हणजे बुद्धांच्या आईला पडलेलं स्वप्न!

3) एका वाक्यात उत्तर लिहा. [2]


i) गौतम बुद्धांच्या आईचे नाव?

ii) लेणी खोद्णारे कोण होते?

प्र. 2 {अ} कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1. खालील आकृती पूर्ण करा. [2]

i)





| | |
|---|---|
| बहु हा कानवाळुनि बहु हा दयाळु । | न मागतां आभारी आम्हें आप होतो । |
| जाणे लळा पाळू भाविकांचा ॥१॥ | भाविकांसी देतो भुक्ति मुक्ति ॥३॥ |
| जात वित गोत न पाहेचि कांही । | चोखा म्हणे ऐसा लाघवी श्रीहरी । |
| घालावीं हे पायीं मिठी उगी ॥२॥ | भवभय वारी दरुशने ॥४॥ |

2. खालील ओळींचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. [2]

बहु हा कानवाळुनि बहु हा दयाळु । जाणे लळा पाळू भाविकांचा ॥१॥

प्र. 2. {आ} कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1. i) आकृती पूर्ण करा. [2]



बिन भिंतीची उघडी शाळा
लाखो इथले गुरु
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांची गोष्ट करू
बघू बंगला या मुंग्यांचा
सुर ऐकुया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू

हिंडू ओढे, धुंडू ओहळ
झाडावरचे काढू मोहळ
चिडत्या, डसत्या मधमाश्यांशी
जरा सामना करू
भल्या सकाळी उन्हात न्हाऊ
ऐन दुपारी पऱ्ह्यात पोहू
सायंकाळी मोजू चांदण्या
गणती त्यांची करू

2. खालील ओळींचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. [2]

बिन भिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरु
झाडे, वेली, पशू, पाखरे यांची गोष्ट करू

प्र. 3. अ}

1}. सूचनेनुसार उत्तरे लिहा. [2]

i) मी शाळेत जातो. ( काळ ओळख.)

ii) थोडीफार माहिती मला सांगितली होती. ( वर्तमानकाळ करा.)

2} वाक्प्रचारांच्या जोड्या लावा. [2]

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| i) निर्धार करणे | आकर्षित करणे |
| ii) भुरळ घालणे | संघर्ष करणे. |
| | निश्चय करणे |

आ} 1} समानार्थी शब्द लिहा . [1]

i) पवन -

ii) पर्वत -

2} शब्दांतील अक्षरावरून अर्थपूर्ण शब्द तयार करा. [1]

i) वजनदार -

ii) ताजमहाल -

3} दिलेल्या नावांची चिन्हे लिहा. [1]

i) प्रश्नचिन्ह - ☐

ii) एकेरी अवतरण चिन्ह - ☐

4}. खालील शब्दांतील शुद्ध शब्द निवडून लिहा. [1]

i) शिक्सक, शिक्षक , सिक्षक , शीक्षक.

ii) कुरुप , कूरूप , कुरूफ , करूप.

प्र. 4. {अ} पत्रलेखन . [4]

सूचना फलक
फारूक सत्तार उमर भॉय हायस्कूल फॉर बॉईज

शाळेची सहल महाबळेश्वर येथे जात आहे.
इच्छुक विद्यार्थांनी फीस सह नावे नोंदवावीत.
मुख्याध्यापक

↓ सहलीसाठी परवानगी मागणारे पत्र वडिलांना लिहा.

↓ सहलीचे वर्णन करणारे पत्र आईस लिहा.

{आ} खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा. [4]

1. खालील उतारा वाचा व त्याच्या आशयावर पाच प्रश्न तयार करा.

आज शाळेतील खेळांच्या सामन्यांचा शेवटचा दिवस होता, त्यामुळे आज सर्वखेळांचे अंतिम सामने होणार होते. सामने पाहायला विद्यार्थी, शिक्षक व अनेक पालक क्रीडांगणावर जमलेले होते. कबड्डीच्या अंतिम सामन्यासाठी सहावी विरुद्ध सातवी हे संघ क्रीडांगणावर दाखल झाले. सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले. ओली-सुकी झाली. सहावीच्या कर्णधाराने ओली-सुकी जिंकली. त्याने दम घालण्यास सुरुवात केली. सातवीचे खेळाडू तयारच होते. त्यांनी सहावीच्या कर्णधाराला चांगले कोपऱ्यात घेतले. कोपरा धरणाऱ्या मुलाने मोठ्या धीराने त्याचा पाय पकडला. त्याबरोबर मधल्या भिडूने त्याच्यावर एकदम झडप घालून त्याला पकडले. प्रेक्षकांतून जोरदार आरोळ्या उठल्या. सुरुवातीपासून सामना रंगायला सुरुवात झाली..

2. खालील मुद्द्यांवरून कथा लिहा.

मुद्दे : दुपारची वेळ .... सिंह जंगलात गाढ झोपलेला......... उंदराचे अंगावर उड्या मारणे........... सिंहाचे झोप मोडणे ...... हळूच पंज्यात पकडणे ....... दयेची याचना करणे ......... पुढे तोच सिंह शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकणे....... सिंह गर्जना......... त्याच उंदराचे धावत जाणे ....... . . दातांनी जाळे कुरडणे.......... उपकाराची फेड उपकारानेच.

3. फारूक विद्यालयात 'मराठी दिवस' साजरा करण्यात आला. या समारंभाची बातमी तुमच्या शब्दांत लिहा.

4. आईस्क्रीम पार्लर दुकानाची जाहिरात तयार करा.

{इ} खालीलपैकी कोणत्याही एक विषयावर निबंध लेखन करा. [4]

1. माझी आई
- कवितेत साकारलेली
- सर्वांची काळजी
- शाळेची तयारी
- आईचे महत्त्व
- घरातील काम
- आईचे सामाजिक महत्त्व

2. खालील घटक ( पुस्तक ) तुमच्याशी बोलत आहे.
अशी कल्पना करून तिचे आत्मकथन पुढील मुद्द्यांचा उपयोग करून लिहा.




i) माझी निर्मिती ii) माझे सौंदर्य iii) माझे महत्त्व
iv) माझे उपयोग v) माझे दु:ख